दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक २८ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.१५ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# अहेरी इस्टेटचे सहावे राजे माजी राज्यमंत्री राजे अम्ब्रीशराव आत्राम

●आनंद दहागावकर/जिल्हा प्रतिनिधी/गडचिरोली

**१५० वर्षांची परंपरा असलेल्या अहेरी राजघराण्यात पहिले राजे म्हणून राजे धर्मराव महाराज, भुजंगराव महाराज, तिसरे श्रीमंत धर्मराव महाराज, चौथे विश्वेश्वरराव महाराज त्यानंतर सत्यवानराव महाराज आणि आता अम्ब्रीशराव महाराज राजगादीवर विराजमान झाले आहेत. राजे सत्यवानराव महाराज यांचे निधन झाल्यानंतर राजे अम्ब्रीशराव महाराजांचा राज्याभिषेक सोहळा थाटात पार पडला तेव्हा ते अवघे २५ वर्षाचे होते. नागपूर, पुणे, पंचगणी येथील नामांकित शाळांमधून शिक्षण घेतल्यानंतर इंग्लंडला जाऊन बिझनेस लॉ ची पदवी प्राप्त केलेल्या अम्ब्रीशराव महाराजांना युवा पिढीच्या हृदयात मोठे मानाचे स्थान आहे. त्यांचा शांत, संयमी आणि प्रेमळ स्वभाव यामुळे ते लवकर लोकप्रीय झाले. एवढेच नव्हेतर ८०% समाजकारण आणि २० % राजकारण करून या आदिवासीबहुल भागाचा कायापालट करण्याचा त्यांचा मानस आहे.**



राजे अम्ब्रीशराव महाराज यांनी पहिल्यांदा २०१४ मध्ये विधानसभा निवडणूक लढवली. मोठ्या मताधिक्याने ते विजयी झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात राजे अम्ब्रीशराव महाराज यांनी 'आदिवासी विकास व वने' अशी महत्वाची खाती त्यानी सांभाळली. एवढेच नव्हेतर आदिवासीबहुल गडचिरोली जिल्ह्याचे पालकत्व स्विकारून त्यांनी गडचिरोली जिल्ह्याचा कायापालट करण्याचा प्रयत्न केला होता. विशेष म्हणजे अहेरीसारख्या अतिदुर्गम आणि नक्षलग्रस्त भागातील पाचही तालुक्यात प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून ३५० कोटी रुपयांचे कामे केले. आलापल्ली येथे सबस्टेशन, लगाम, आसरअली, जारावंडी, येथे १३२ केव्ही पेरमिली येथे ३३ केव्ही सबस्टेशन, प्रगतीपथावर असलेले अहेरी येथील महिला व बाल रुग्णालय, सिरोंचा व आलापल्ली येथील बसस्थानक, आलापल्ली व नागेपल्ली या दोन गावांसाठी नळ पाणीपुरवठा योजना, मॉडेल स्कुल, एकलव्य स्कुल, रंगय्यापल्ली येथीलप्राथमिक आरोग्य केंद्र, विशेष म्हणजे ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर करून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून गावांचा कायापालट करण्याचे काम त्यांनी त्यांच्या कार्यकाळात केला. कोटच्यावधींची कामे आजही प्रगतीपथावर आहेत.१५० वर्षांपूर्वी अहेरी इस्टेटचा पसारा ५५० चौरस मैल परिसरात पसरलेला होता. ५४८ गावांची जमीनदारी व त्यातल्या १८ गावांची मालगुजारी (मालकी) असे या राजवटीचे स्वरूप होते. हजारो एकर शेतीसोबत संपूर्ण परिसरात असलेले जंगल त्यातले प्राणी व हाडामासांची माणसे या साऱ्यांवर अहेरीच्या आत्राम राजघराण्याचा अंमल होता, श्रीमंत धर्मराव महाराजांना विश्वेश्वरराव महाराज व भगवंतराव महाराज अशी दोन मुले, भगवंतराव महाराज धाकटे असल्याने राजेपद विश्वेश्वरराव महाराजांकडे गेले. १९५१ पासून तब्बल ४० वर्षे त्यांनी राजगादी सांभाळली, राजगादीवर विराजमान होताच अत्यंत कठीण आणि प्रतिकूल परिस्थितीत न डगमगता त्यांनी अहेरी परिसरातील जनतेचा विश्वास संपादन करण्यास सुरुवात केली. तेव्हा कमालीची गरिबी अनुभवणाऱ्या या राजाने हाताशी असलेल्या तुटपुंज्या शेतीतून आपले उत्पन्न वाढविण्यावर भर दिला. त्याचवेळी या भागातील आदिवासी शिक्षित झाले पाहिजेत यासाठी १९५८ साली धर्मराव शिक्षण मंडळाची त्यांनी स्थापना करून या भागात शाळा, महाविद्यालयांचे जाळे विणायला सुरुवात केली.लोकशाही व्यवस्थेत लोकांचे प्रेम आणि आपुलकी संपादन करायचे असेल तर समाजकारणात सोबत राजकारण करण्याशिवाय पर्याय नाही, हे त्यांच्या लक्षात आले. म्हणून राजे विश्वेश्वरराव महाराज यांनी आदिवासी सेवा मंडळ स्थापन करून त्या माध्यमातून निवडणुकीच्या राजकारणावर लक्ष केंद्रीत केले. पुढे याच मंडळाचे नाग विदर्भ आंदोलन समिती असे नामकरण झाले. काळी टोपी व टोकाचा काँग्रेस विरोध या बळावर तीनदा आमदार व दोनदा खासदार पद भूषविणाऱ्या विश्वेश्वरराव महाराजांना या भागात कमालीची लोकप्रियता लाभली. त्यांनी काँग्रेसमध्ये यावे म्हणून पंडित जवाहरलाल नेहरूंपासून तर शंकरराव चव्हाणांपर्यंत अनेकांनी प्रयत्न केले. पण महाराज बदलले नाहीत. कायम विरोधी पक्षात राहिलेला हा राजा बसने प्रवास करायचा. १९९७ साली राजे विश्वेश्वरराव महाराजांचे निधन झाले. त्यानंतर गादीवर विराजमान झालेल्या सत्यवानराव महाराजांची कारकीर्द अवधी वर्षाची राहिली. एकदा आमदार म्हणून निवडून आलेले सत्यमराव महाराज अहेरीत कमी आणि नागपुरातच जास्त काळ राहत. त्यांची तब्येत साथ देत नसल्याने त्यांचा जनतेशी संपर्क कमी राहिला. वडिलांच्या निधनानंतर अहेरीत दाखल झालेल्या अम्ब्रीशराव महाराजांनी पुन्हा सक्रिय होण्याचा ध्यास घेतला होता. पहिल्याच निवडणुकीत जनतेने त्यांना भरपूर प्रेम दिल. ५ वर्षे त्यांनी अहेरी विधानसभेसाठी मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणला. २०१९ च्या निवडणुकीत अल्पशा मतांनी त्यांचा पराभव झाला. मात्र त्यांनी अहेरी सोडले नाही. नेहमी जनतेच्या पाठीशी राहून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्याचे काम सुरूच आहे. पूर्वी ज्याप्रमाणे राजे विश्वेश्वरराव महाराजांनी हजारो एकर जमीन शासनाला व आदिवासींना दान केली होती. दानशूर म्हणून ओळख होती. त्याचप्रमाणे नातू सुद्धा आज विश्वेश्वरराव महाराजांच्या पावलावर पाऊल ठेवून चालत असल्याचे दिसून येत आहे. मोठ्या आशेने त्यांच्याकडे जाणारे लोक कधीच नाराज झाले नाहीत हे विशेष. युवा पिढी ही देशाची सर्वात मोठी संपत्ती समजून बदलत्या परिस्थितीनुसार राजे अम्ब्रीशराव महाराज आत्राम यांनी नव्या पिढीला घेऊन राजकारण करायला सुरुवात केल्याने जनतेमध्ये एक विश्वास निर्माण झाला आहे. अशा या राजांचा आज जन्मदिवस.लोकांचे लोकप्रिय दैनिक सह्याद्रीचा राखणदार परिवारातर्फे त्यांना जन्मदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा महाराजांना जनसेवेसाठी निरोगी व निरामय आरोग्य लाभो हीच शुभकामना.



# चला आजपासून वाचन करूया

**अवांतर वाचन,कठोर परिश्रम आणि प्रामाणिकपणा या गुणांच्या शिदोरीवर माणूस काय बनू शकतो. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ .एपीजे अब्दुल कलाम होय. प्रबळ इच्छाशक्ती आणि आत्मविश्वास निर्माण झाला की माणूस सदैव यशस्वीतेची शिखरे पादाक्रांत करू शकतो. समाजातील अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार, अंधश्रद्धा दूर करू शकतो. भरकटलेल्या समाजाला आधार देऊ शकतो. स्वत:च्या वागण्यातून माणूसकी सिद्ध करणारे व्यक्तिमत्व म्हणजे एपीजे अब्दुल कलाम साहेब.**






ज्यांचे वर्णन करताना शब्दांनाही विचार करावा लागावा, एक कोड पडावं असे ते होते. आपल्या देशामध्ये अनेक थोर व्यक्तिमत्व होऊन गेलीत .परंतु केवळ वाचनाच्या भरोशावर बुद्धिमान, हुशार, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात आपली स्वत:ची स्वतंत्र अशी ओळख निर्माण करणारे नेते हाताच्या बोटावर मोजता येतील इतकेच आहे. माणसे जन्माला येतात व निसर्गाच्या नियमाने निघूनही जातात. परंतु कायमची लक्षात मोजकीच राहतात. ज्यांच्या जाण्याने मनापासून निराश वाटते अशा व्यक्तिमत्त्वांपैकी एक व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ .एपीजे अब्दुल कलाम. डॉ .कलाम यांचा जन्म १९३१ मध्ये रामेश्वरम (तामिळनाडू) या ठिकाणी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण रामनाथपुरम मधून मिशनरी शाळेत पूर्ण झाले. महाविद्यालयीन शिक्षण तिरुचिरापल्ली सेंट जोसेफ मध्ये झालं. वैज्ञानिक सल्लागार पदापासून ते राष्ट्रपती पदापर्यंत त्यांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले. संशोधन क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात प्रगती घडवून आणणारे व्यक्तिमत्त्व म्हणजेच डॉ.एपीजे हे आदर्श शिक्षकही असल्याने अंतिम श्वासापर्यंत त्यांनी वाचनाचा छंद जोपासला. माणूस मोठा होऊ शकतो हे त्यांनी स्वत:च्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखविले. त्यांचे वडील नाव चालवत होते. अशा व्यक्तीचा मुलगा देशाचा राष्ट्रपती होऊ शकतो हा चमत्कार फक्त भारतामध्येच होऊ शकतो. भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस १५ ऑक्टोबर सर्वत्र 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जातो. दुर्दम्य इच्छाशक्ती आणि आत्मविश्वास या बळावर त्यांनी अनेकांची मने जिंकली.एके दिवशी भारत नक्कीच महासत्ता बनेल हे त्यांचे स्वप्न होते. तो आत्मविश्वास त्यांनी प्रत्येक भारतीयांच्या मनात निर्माण केला. डॉ. कलाम यांचे व्यक्तिमत्व युवाशक्तीसाठी स्फूर्तीदायी आहे. डॉ. कलाम यांचे विचार आणि पुस्तके वाचावीत यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये त्यांचा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिवस' म्हणून साजरा करण्यात येतो. आजचा विद्यार्थी अवांतर वाचनाकडे वळला पाहिजे. त्यामुळे त्यांना अनेक प्रकारचे संदर्भ मिळू शकतात, आकलनशक्ती वाढेल आणि ज्ञानाचा विकास होईल. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजविण्यासाठी आजचा हा दिवस उपयुक्त ठरणार आहे. मी दररोज निदान एखादा तास तरी अवांतर वाचन करीन असा संकल्प या निमित्ताने विद्यार्थ्यांनी करायला पाहिजे.

पुस्तकांसारखा दुसरा मित्र नाही. केवळ पुस्तकांमुळेच डॉ .कलामांचे व्यक्तिमत्व सकारात्मक आणि दूरदृष्टीपर होऊ शकले. वाचन प्रेरणा दिनातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड व प्रेरणा निर्माण होईल. त्यांना वाचण्याचे महत्त्व पटेल असे वाटते. डॉ.एपीजे कलाम यांना खरोखरच आपल्याला श्रद्धांजली द्यायची असेल, त्यांच्या कार्याप्रती प्रामाणिक श्रद्धा असेल तर प्रत्येक महाविद्यालय, शाळांमध्ये वाचनकट्टा निर्माण केला पाहिजे.

कुठल्याही कार्यक्रमानिमित्ताने परस्परांना पुस्तके भेट देण्याची सवय लावायला पाहिजे. घराघरांत वाचनपेढी, पुस्तकांचे महत्त्व प्रतिपादन करणारे चर्चासत्रे ,व्याख्याने, पुस्तक प्रदर्शनी यांचे आयोजन घडवून त्यांच्या विचाराला प्रत्यक्ष कृतीतून सलामी दिली पाहिजे. वाढदिवशी अनेकजण फळे, कपडे वाटप करतात. आजच्यादिनी गरजू आणि होतकरूंना पुस्तकांचे वाटप केले पाहिजे.

# भारताच्या पोखरण अणूचाचणीचे आधारस्तंभ : अब्दुल कलाम

अवुल पाकीर जैनुलाब्दीन तथा ए.पी.जे अब्दुल कलाम हे एक भारतीय एरोस्पेस शास्त्रज्ञ होते. कलाम यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तामिळनाडूच्या रामेश्वरम येथे झाला, तेथेच वाढले आणि तेथेच त्यांनी भौतिकशास्त्र आणि एरोस्पेस अभियांत्रिकीचा अभ्यास केला. त्यांनी पुढील चार दशके शास्त्रज्ञ आणि विज्ञान प्रशासक म्हणून, प्रामुख्याने संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (DRDO) आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था (खडठज) येथे काम केले. भारताच्या नागरी अंतराळ कार्यक्रमात आणि लष्करी क्षेपणास्त्र विकासाच्या प्रयत्नांमध्ये त्यांचा खूप मोठा सहभाग होता. अशा प्रकारे बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आणि प्रक्षेपण वाहन तंत्रज्ञानाच्या विकासावर केलेल्या कामामुळे ते भारताचे 'मिसाइल मॅन' म्हणून ओळखले जाऊ लागले.

१९९८ मध्ये भारताच्या पोखरण-खख अणुचाचण्यांमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण संघटनात्मक, तांत्रिक आणि राजकीय भूमिका बजावली. १९७४ मध्ये भारताने केलेल्या मूळ अणुचाचणीनंतर ही पहिलीच चाचणी होती.



प्रविण बागडे
नागपूर,९९२३६२०९१९

कलाम यांची २००२ मध्ये सत्ताधारी भारतीय जनता पक्ष आणि तत्कालीन विरोधी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या पाठिंब्याने भारताचे ११ वे राष्ट्रपती म्हणून निवड झाली. त्यांना पीपल्स प्रेसिडेंट (जनतेचे राष्ट्रपती) म्हणून व्यापकपणे संबोधले गेले. राष्ट्रपतीपदानंतर कलाम हे शिक्षण, लेखन आणि सार्वजनिक सेवेच्या नागरी जीवनात परतले. भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान असलेल्या भारतरत्नासह अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांचे ते मानकरी होते. १९६० मध्ये मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधून पदवी घेतल्यानंतर कलाम हे संरक्षण संशोधन आणि विकास सेवा (DRDS) चे सदस्य बनले आणि त्यानंतर संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेच्या (प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो, भारत सरकारद्वारे) एरोनॉटिकल डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट मध्ये शास्त्रज्ञ म्हणून सामील झाले. त्यांनी एक लहान हॉवरक्राफ्ट डिझाईन करून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली, परंतु डीआरडीओमध्ये नोकरीच्या निवडीबद्दल त्यांना खात्री पटली नाही. कलाम हे प्रसिद्ध अंतराळ शास्त्रज्ञ विक्रम साराभाई यांच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या INCOSPAR समितीचा देखील भाग होते. १९६३ ते १९६४ मध्ये कलामांनी नासाच्या व्हर्जिनियामधील हॅम्प्टन येथील लँगली संशोधन केंद्र, ग्रीनबेल्ट, मेरीलँडमधील गोडार्ड स्पेस फ्लाइट सेंटर आणि वॉलॉप्स फ्लाइट सुविधा या केंद्रांना भेटी दिल्या. १९७० आणि १९९० च्या दरम्यान कलाम यांनी पोलर सॅटेलाइट लॉन्च व्हेईकल (PSLV) आणि SLV-III प्रकल्प विकसित करण्याचा प्रयत्न केला, जे दोन्ही यशस्वी ठरले. कलाम यांना राजा रामण्णा यांनी टीबीआरएलचे प्रतिनिधी म्हणून स्माइलिंग बुद्धा या देशातील पहिल्या अणुचाचणीचे साक्षीदार होण्यासाठी, जरी त्यांनी त्याच्या विकासात भाग घेतला नसला तरी, आमंत्रित केले होते. १९६९ मध्ये कलाम यांची भारतीय अंतराळ संशोधन संस्था मध्ये बदली करण्यात आली जिथे ते भारताचे पहिले उपग्रह प्रक्षेपण वाहन (SLV-III) चे प्रकल्प संचालक होते, ज्याने जुलै १९८० मध्ये रोहिणी उपग्रह पृथ्वीच्या जवळच्या कक्षेत यशस्वीरित्या तैनात केला होता; कलाम यांनी पहिल्यांदा १९६५ मध्ये डीआरडीओ येथे स्वतंत्रपणे विस्तारित रॉकेट प्रकल्पावर काम सुरू केले होते. १९६९ मध्ये कलाम यांना सरकारची मान्यता मिळाली आणि त्यांनी अधिक अभियंते समाविष्ट करण्यासाठी कार्यक्रमाचा विस्तार केला. १९७० च्या दशकात कलाम यांनी प्रोजेक्ट डेव्हिल आणि प्रोजेक्ट व्हॅलिअंट या दोन प्रकल्पांचेही दिग्दर्शन केले, ज्यात यशस्वी SLV प्रोग्रामच्या तंत्रज्ञानातून बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे विकसित करण्याचा प्रयत्न केला होता. केंद्रीय मंत्रिमंडळाची नापसंती असूनही, पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी कलाम यांच्या संचालक पदाखाली त्यांच्या विवेकाधिकारांद्वारे या एरोस्पेस प्रकल्पांसाठी गुप्त निधी वाटप केला. कलाम यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाला या वर्गीकृत एरोस्पेस प्रकल्पांचे खरे स्वरूप लपविण्यास पटवून देण्याची अविभाज्य भूमिका बजावली. त्यांच्या संशोधन आणि शैक्षणिक नेतृत्वामुळे त्यांना १९८० च्या दशकात मोठी प्रतिष्ठा मिळाली, ज्यामुळे सरकारला त्यांच्या संचालक पदाखाली प्रगत क्षेपणास्त्र कार्यक्रम सुरू करण्यास प्रवृत्त केले.कलाम आणि संरक्षण मंत्र्यांचे धातुशास्त्रज्ञ आणि वैज्ञानिक सल्लागार डॉ. व्ही. एस. अरुणाचलम यांनी तत्कालीन संरक्षण मंत्री आर. वेंकटरामन यांनी एका पाठोपाठ एक नियोजित क्षेपणास्त्रे घेण्याऐवजी एकाचवेळी क्षेपणास्त्रांचा थरकाप विकसित करण्याच्या प्रस्तावावर काम केले. इंटिग्रेटेड गाईडेड मिसाईल डेव्हलपमेंट प्रोग्राम (IGMDP) नावाच्या मिशनसाठी ३.८८ अब्ज वाटप करण्यासाठी मंत्रिमंडळाची मंजूरी मिळवण्यात आर. वेंकटरामन यांचा मोलाचा वाटा होता आणि कलाम यांची मुख्य कार्यकारी म्हणून नियुक्ती केली. कलाम यांनी मिशन अंतर्गत अनेक क्षेपणास्त्रे विकसित करण्यात प्रमुख भूमिका बजावली, ज्यात अग्नी, एक मध्यवर्ती श्रेणीचे बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आणि पृथ्वी, पृष्ठभागावरून पृष्ठभागावर मारा करणारे सामरिक क्षेपणास्त्र यांचा समावेश होतो. परंतु या प्रकल्पांवर गैरव्यवस्थापन आणि खर्च तसेच वेळ वाढल्याबद्दल टीका झाली आहे.कलाम यांनी जुलै १९९२ ते डिसेंबर १९९९ या कालावधीत पंतप्रधानांचे मुख्य वैज्ञानिक सल्लागार आणि संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे सचिव म्हणून काम केले. पोखरण-खख या अणुचाचण्या या काळात घेण्यात आल्या, ज्यामध्ये त्यांनी सखोल राजकीय आणि तांत्रिक भूमिका बजावली. कलाम यांनी चाचणी टप्प्यात राजगोपाल चिदंबरम यांच्यासह मुख्य प्रकल्प समन्वयक म्हणून काम केले. या काळात कलाम यांच्या मीडिया कव्हरेजमुळे ते देशातील सर्वात प्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ बनले. १९९८ मध्ये, हृदयरोगतज्ज्ञ सोमा राजू यांच्या समवेत कलाम यांनी कलाम-राजू स्टेंट नावाचा कमी किमतीचा कोरोनरी स्टेंट विकसित केला. २०१२ मध्ये या जोडीने ग्रामीण भागातील आरोग्य सेवेसाठी एक खडबडीत टॅबलेट संगणक तयार केला, ज्याला कलाम-राजू टॅब्लेट असे नांव देण्यात आले. राष्ट्रपती भवनावर कब्जा करणारे ते पहिले वैज्ञानिक आणि पहिले पदवीधर देखील होते.त्यांच्या राष्ट्रपतीपदाच्या कार्यकाळात, त्यांना प्रेमाने जनतेचे राष्ट्रपती म्हणून ओळखले जात असे. असे म्हणतात की, ऑफिस ऑफ प्रॉफिट बिलावर स्वाक्षरी करणे हा त्यांच्या कार्यकाळात घेतलेला सर्वात कठीण निर्णय होता. कलाम यांच्या कार्यकाळात त्यांना सादर केलेल्या २१ पैकी २० दयेच्या अर्जांचे भवितव्य ठरवण्यात त्यांच्या निष्क्रियतेबद्दल त्यांच्यावर टीका करण्यात आली होती. भारतीय राज्यघटनेचे कलम ७२ भारताच्या राष्ट्रपतींना माफी देण्याचे आणि फाशीच्या शिक्षेवरील दोषींची फाशीची शिक्षा निलंबित किंवा कमी करण्याचा अधिकार देते. कलाम यांनी त्यांच्या राष्ट्रपतीपदाच्या पाच वर्षांच्या कार्यकाळात केवळ एका दयेच्या याचिकेवर कारवाई केली, बलात्कारी धनंजय चॅटर्जीची याचिका फेटाळून लावली, ज्याला नंतर फाशी देण्यात आली. कदाचित सर्वात उल्लेखनीय याचिका अफझल गुरूची होती. तो एक काश्मिरी दहशतवादी होता, ज्याला डिसेंबर २००१ मध्ये भारतीय संसदेवर झालेल्या हल्ल्यात कट रचल्याबद्दल दोषी ठरवण्यात आले होते आणि २००४ मध्ये भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने त्याला फाशीची शिक्षा सुनावली होती. २० ऑक्टोबर २००६ रोजी शिक्षा ठोठावण्यात येणार असताना, त्याच्या दयेच्या अर्जावर प्रलंबित कारवाईमुळे तो मृत्यूदंडावर राहिला. कलाम यांनी २००५ मध्ये बिहारमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा वादग्रस्त निर्णयही त्यांनी घेतला. सप्टेंबर २००३ मध्ये, PGI चंडीगढ या संस्थेमधील संवादात्मक सत्रात, कलाम यांनी देशाची लोकसंख्या लक्षात घेऊन भारतात समान नागरी संहितेच्या गरजेचे समर्थन केले. अनेक नागरिकांनीही हीच इच्छा व्यक्त केली आहे. यातून केवळ त्यांचे माझ्याबद्दलचे प्रेम आणि आपुलकी आणि लोकांच्या आकांक्षा दिसून येतात. या समर्थनामुळे मी खरोखर भारावून गेलो आहे. ही त्यांची इच्छा असल्याने मी त्याचा आदर करतो. त्यांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मला त्यांचे आभार मानायचे आहेत. राष्ट्रपतीपदानंतर कलाम इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट शिलाँग, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अहमदाबाद आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट इंदूर येथे व्हिजिटिंग प्रोफेसर बनले; इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगलोरचे मानद फेलो; इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजी तिरुवनंतपुरमचे कुलपती; अण्णा विद्यापीठातील एरोस्पेस अभियांत्रिकीचे प्राध्यापक; आणि भारतभरातील इतर अनेक शैक्षणिक आणि संशोधन संस्थांमध्ये सहायक. त्यांनी हैदराबादच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीमध्ये माहिती तंत्रज्ञान आणि बनारस हिंदू विद्यापीठ आणि अण्णा विद्यापीठात तंत्रज्ञान शिकवले.२०११ मध्ये कलाम यांच्या कूडनकुलम अणुऊर्जा प्रकल्पावरील भूमिकेवरून नागरी गटांनी त्यांच्यावर टीका केली होती; त्यांनी अणुऊर्जा प्रकल्पाच्या स्थापनेला पाठिंबा दिला आणि स्थानिक लोकांशी बोलत नसल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला. आंदोलकांनी त्याच्या भेटीला विरोध केला कारण त्यांनी त्याला अण्वस्त्र समर्थक शास्त्रज्ञ म्हणून पाहिले आणि प्लांटच्या सुरक्षा वैशिष्ट्यांबाबत त्यांनी दिलेल्या आश्वासनामुळे ते प्रभावित झाले नाहीत. मे २०१२ मध्ये कलाम यांनी भारतातील तरुणांसाठी व्हॉट कॅन आय गीव्ह मूव्हमेंट नावाचा एक कार्यक्रम सुरू केला, ज्याची मुख्य थीम भ्रष्टाचारावर मात केली होती.इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट शिलाँग येथे पृथ्वी नावाचा एक जीवंत ग्रह तयार करणे या विषयावर व्याख्यान देत असताना कलाम कोसळले आणि २७ जुलै २०१५ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने वयाच्या ८३ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. ३० जुलै २०१५ रोजी राष्ट्रीय स्तरावरील मान्यवरांसह पंतप्रधान, तामिळनाडुचे राज्यपाल आणि कर्नाटक, केरळ आणि आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री यांच्यासह ३५०,००० हुन अधिक लोकं त्यांच्या गावी रामेश्वरम येथे आयोजित अंत्यसंस्कार समारंभास उपस्थित होते, जिथे त्यांना पूर्ण राज्य इतमामाने दफन करण्यात आले.



# माजी पालकमंत्री अम्ब्रीशराव आत्राम यांच्या विकासकामांची आजही जोरदार चर्चा



**आनंद दहागावकर/गडचिरोली/जिल्हा प्रतिनिधी**

माजी पालकमंत्री राजे अम्ब्रीशराव आत्राम यांच्या कार्यकाळात गडचिरोली जिल्ह्यात कोट्यवधी रुपयांच्या निधीतून अनेक विकास कामे झाली असून त्या कामांची आजही जोरदार चर्चा सुरू आहे. २०१४ मध्ये पहिल्यांदाच राजे अम्ब्रीशराव आत्राम अहेरी विधानसभा क्षेत्रातून आमदार म्हणून निवडून आले. राज्याचे तात्कालीन मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात त्यांना आदिवासी विकास व वन खाते सोबतच गडचिरोली जिल्ह्याचे पालकत्व सोपविण्यात आले होते. त्यांनी मिळालेल्या संधीचे सोनं केले असून आजही अहेरी विधानसभा क्षेत्रातच नव्हेतर गडचिरोली जिल्ह्यात त्यांनी खेचून आणलेल्या निधीतील विकास कामे सुरू आहेत. याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे अहेरी येथे सुरू असलेले ५८ कोटी रुपयांचा महिला व बाल रुग्णालय. अहेरी येथे रुग्णालय बांधकाम करण्यासाठी जागा उपलब्ध नव्हती मात्र, स्वतःकडे वन खाते असल्याने त्यांनी या आदिवासीबहुल भागातील महिला व बालकांना योग्य आणि वेळेवर उपचार मिळावे या हेतूने त्यांनी जागाही मिळवून दिली. अहेरी विधानसभा क्षेत्रातील पाचही तालुक्यात प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून तब्बल ३५० कोटी रुपयांचे रस्ते व पुलाचे बांधकाम केले. त्यामुळे अनेक गावे शहरासोबत जोडण्यास मदत झाली. केवळ अहेरीचाच विचार न करता विशेष म्हणजे आलापल्ली आणि नागेपल्ली या मुख्य शहरात वास्तव्याने राहणाऱ्या नागरिकांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळावे या हेतूने जीवन प्राधिकरणाचा १० कोटी रुपयांची संयुक्त पाणी पुरवठा योजना आणली. खेड्यापाड्यातील प्रत्येक गावात वीज पुरवठा व्हावा, विजेचा लपंडाव थांबावा यासाठी आलापल्ली येथे १३२ केव्ही, आष्टी ते आलापल्ली ४० किलोमीटर टॉवरलाईन, लगाम येथे ३३ केव्ही, आसरअली, जारावंडी आणि पेरमिली येथील ३३ केव्ही सबस्टेशन साठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यातील बरेच कामे पूर्णत्वास आले आणि काही कामे आज प्रगतीपथावर आहेत. या व्यतिरिक्त कोट्यवधी रुपयांची विकासकामे त्यांनी खेचून आणली होती.त्यांच्या कार्यकाळात अनेक रस्त्याचे बांधकाम झाले त्यात डांबरीकरणचे काम महत्वाचे होते. मात्र आज त्या रस्त्यांची दयनीय अवस्था झाली असून नागरिकांना रस्त्यावरील खड्ड्यातून प्रवास करावा लागत आहे. सध्या अहेरी उपविभागातील पाचही तालुक्यात रस्त्यांची दयनीय अवस्था झाली असून अपघातांचे प्रमाण वाढले आहे.केवळ डागडुजी करून थातुरमातुर काम केले जात आहे. मात्र डांबरीकरणाचे नवीन काम होत नसल्याचे स्थानिकांमधून रोष व्यक्त केला जात आहे. त्यामुळे माजी पालकमंत्री राजे अम्ब्रीशराव आत्राम यांचा पाच वर्षांचा कार्यकाळ बरा होता असा सुर अहेरी विधानसभा क्षेत्रात निघताना दिसत आहे. सध्या राजे अम्ब्रीशराव आत्राम कुठलेही पदावर नसले तरी त्यांनी केलेल्या कामांची प्रसंशा होताना दिसत आहे हे उल्लेखनीय आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहराध्यक्षपदी आकाश येसनकर यांची निवड



**मूल (प्रतिनिधी)**

येथील युवा सामाजिक कार्यकर्ते आकाश येसनकर यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या मूल शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांनी सदर निवड केली असुन राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा जिल्हयाचे संपर्कमंत्री नामदार धर्मरावबाबा आत्राम यांच्या हस्ते सदर नियुक्तीपत्र देण्यात आले.

मूल तालुक्यातील विविध समस्यांना वाचा फोडणारे, वेळप्रसंगी आंदोलनात्मक भुमिका घेवुन अन्यायग्रस्ताना न्याय मिळवुन देणारे युवा क्रांती संघटनेचे नेते आकाश येसनकर यांच्या कार्याची दखल घेवुन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांनी त्यांना मूल शहराध्यक्षपदी निवड केली. तालुकाध्यक्ष मंगेश पोटवार यांनी त्यांच्या नावाची जिल्हाध्यक्षांकडे शिफारस केली होती, त्यांनुसार त्यांची निवड केली असुन त्यांना नामदार आत्राम यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

चंद्रपूर येथील विश्राम गृहात पार पडलेल्या एका छोटयाखाणी कार्यक्रमात सदर नियुक्तीपत्र देण्यात आले असुन यावेळी मूल तालुक्यातील शेकडो युवा कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केले. यावेळी सर्वांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे खांदयावर दुप्पटे त्यांचे नामदार आत्राम यांनी स्वागत केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर, शहर जिल्हाध्यक्ष राजीव कक्कड, प्रदेश सचिव आबिद अल्ली, वरोरा विधानसभा अध्यक्ष विलास नेरकर, मूल तालुकाध्यक्ष मंगेश पोटवार उपस्थित होते.

# १६ लाखांचे बक्षीस असलेल्या जहाल माओवाद्यास अटक

**गडचिरोली (प्रतिनिधी)**

जिल्हा हा नक्षल प्रभावित जिल्हा म्हणुन ओळखला जातो. येथील माओवादी हे सरकारी मालमत्तेचे नुकसान करणे, पोलीस दलावर हल्ले करुन त्यांच्या जवळील शस्त्रे लुटून नेणे, रस्ते व इतर प्रकारच्या सरकारी कामात अडथळा आणून जाळपोळ करणे इ. देशविघातक कृत्य करत असतात. माओवाद्यांच्या या देशविघातक कृत्यांना गडचिरोली पोलीस दल नेहमीच सामोरे जाऊन आळा घालतात. १४ ऑक्टोबर रोजी जहाल माओवादी नामे चैनुराम ऊर्फ सुक्कु वत्ते कोरसा, (वय ४८), रा. टेकामेट्टा, जि. नारायणपूर (छत्तीसगड) हा गडचिरोली जिल्ह्याच्या सिमावर्ती भागातील कांकेर (छ.ग.) सिमेलगत असलेल्या पोस्टे जारावंडी व पोस्ट पंढरी या दोन्ही पोस्टची घातपात करण्याच्या उद्देशाने रेकी करण्यासाठी येणार असल्याच्या मिळालेल्या गोपनिय माहीतीच्या आधारे पोलीस स्टेशन जारावंडी हद्दीतील मौजा जारावंडी ते सोहगाव जाणाऱ्या रोडवरील कूरमावडा फाट्याजवळ विशेष अभियान पथकाचे जवानांनी नक्षलविरोधी अभियान राबवून त्यास अटक केली. त्यास सन २०२३ साली मौजा



हिक्केर जंगल परिसरात झालेल्या पोलीस माओवादी चकमकीवरुन पोस्टे एटापल्ली जि. गडचिरोली येथे दाखल अप. क्र. ००१३/२०२३ कलम ३०७, ३५३, १४३, १४८, १४९, १२० (ब) भादवी, ३/२५, ५ / २७ भारतीय हत्यार कायदा, ३, ४ भारतीय स्फोटक कायदा १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा व १३, १६, १८ (अ) यूएपीए ॲक्ट अन्वये गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.चैनुराम ऊर्फ सुक्कु वत्ते कोरसा २६ जुन २००० ला पर्लकोटा दलममध्ये सदस्य या पदावर भरती झाला. सन २००२ ला एसीएम पदावर पदोन्नती होऊन सन २००३ पर्यंत कार्यरत. सन २००३ मध्ये डीव्हीसीएम पदावर पदोन्नती होऊन सन २०१४ पर्यंत माड डिव्हीजनमध्ये कार्यरत. सन २०१४ मध्ये डिव्हीसीएम पदावरुन डिमोशन होऊन एसीएम पदावर सप्लाय टीम / स्टाफ टीममध्ये त्याने काम केले. सप्लाय टीम / स्टाफ टीममध्ये दिनांक २६/११/२०१६ ला पुन्हा डीव्हीसीएम पदावर पदोन्नती होऊन सप्लाय टीम / स्टाफ टीममध्ये उप-कमांडर या पदावर आजपर्यंत काम केले.त्याच्यावर ७ चकमक व १ खुन असे ८ गुन्हे दाखल होते. महाराष्ट्र शासनाने चनुराम ऊर्फ सुक्कु वत्ते कोरसा याच्या अटकेवर १६ लाख रूपयाचे बक्षीस जाहिर केले होते.गडचिरोली पोलीस दलाच्या प्रभावी कारवाईमुळे माहे जानेवारी २०२२ ते आतापर्यंत एकूण ७१ माओवाद्यांना अटक करण्यात गडचिरोली पोलीस दलास यश आलेले आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) अनुज तारे, अपर पोलीस पोलीस अधीक्षक (प्रशासन) कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक, अहेरी यतिश देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस अधीक्षक यांनी माओवाद्यांना माओवादाची हिंसक वाट सोडुन आत्मसमर्पण करून सन्मानाने जीवन जगण्याचे आवाहन केले आहे.

# मानवी तस्करी या विषयाकडे लक्ष वेधण्यासाठी चंद्रपूर येथे वॉक फॉर फ्रिडम

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व व्हिजन रेस्क्यू यांचा संयुक्त उपक्रम

**चंद्रपूर (प्रतिनिधी)**

मानवी तस्करी हा विषय संपूर्ण जगामधे अतिशय गंभीर होत चालला आहे. या विषयाकडे सामान्य नागरिकांच लक्ष जावं , त्यांनीही सजग व्हावं या दृष्टिकोनातून महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर व व्हिजन रेस्क्यू यांच्या संयुक्त विद्यमाने वॉक फॉर फ्रिडम चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश समृद्धी भिष्म, जिल्हा विधीसेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी, तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश प्रशांत काळे, प्रभारी मुख्य न्यायदंडाधिकारी प्रवीण कुलकर्णी, चंद्रपूर जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष ड. अभय पाचपोर आणि सचिव आशिष धर्मपुरीवार, व्हिजन रेस्क्यू संस्थेचे प्रतिनिधी भुषण तोंडरे , वॉक फॉर फ्रिडम चंद्रपूर जिल्हा समन्वयक शाम हेडाऊ आदिंची उपस्थिती होती. वॉक फॉर




फ्रिडम मधे चंद्रपूर शहरातील सर्व महाविद्यालयाचे विद्यार्थी व प्राध्यापक वृंद, जिल्हा व सत्र न्यायालयाचे कर्मचारी , जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालयाचे कर्मचारी,चंद्रपूर जिल्हा बार असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य , ईको - प्रो चे बंडू धोत्रे, विद्यार्थी संघटना आदिंचा समावेश होता. यावेळी बोलतांना प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश समृद्धी भिष्म यांनी, मानवी तस्करी हा अतिशय गंभीर विषय असून याबाबत आपण सगळ्यांनी जागरुक रहायला हवं, सजग रहायला हवं व आवश्यक तिथे लगेच समोर येत संबंधित विभागाला तक्रार करायला हवी यासाठीच हा वॉक फॉर फ्रिडम आपण घेत आहोत, असे मत व्यक्त केले. तर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव सुमित जोशी यांनी प्रास्ताविकातून मानवी तस्करी या विषयाची सविस्तर माहिती देत कार्यक्रमाच्या आयोजनामागची भुमिका विषद केली. तत्पूर्वी श्रीमती भिष्म यांनी झेंडा दाखवून वॉक फॉर फ्रिडमला स्थानिक गांधी चौक येथून सुरुवात केली. सदर रैली जटपूरा गेटला वळसा घालून कस्तुरबा रोड मार्गे परत गांधी चौक येथे वॉक फॉर फ्रिडमची सांगता करण्यात आली.या कार्यक्रमाचे संचालन शाम हेडाऊ यांनी तर आभार व्हिजन रेस्क्यूचे भुषण तोंडरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी धनंजय साखरकर, देवानंद साखरकर, शैलेश दिंडवार, चिन्मय भागवत , पियुष बनकर, आदित्य गचकेश्वर, ओंकार सायंकार, तन्मय बनकर , ओंकार बक्षी आदिंनी अथक परिश्रम घेतले.

# वरोरा व भद्रावती बसस्थानकाची स्वच्छता कमिटीकडून तपासणी

## हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बस स्थानक स्पर्धेत बसस्थानकांचा सहभाग



**वरोरा (प्रतिनिधी)**

राज्यपरिवहन महामंडळामार्फत हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बस स्थानक अभियान स्पर्धेअंतर्गत वरोरा आगार व भद्रावती बस स्थानक तपासणीस आलेले भंडारा विभागाच्या पथकाचे वरोरा आगार व्यवस्थापक पुण्यवर्धन वर्धेकर यांनी वरोरा बसस्थानकावर स्वागत केले. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांच्या माध्यमातून राज्यातील ३१ जिल्हयातील राज्य परीवहन महामंडळाची आगारे व बसस्थानके यांची तपासणी व्हावी. प्रवाश्यांना सेवा व सुविधा मिळतात की नाही याबरोबर आगार व बसस्थानकांत गाड्यासह परिसराची स्वच्छता राहते की नाही याची दरवर्षी पहाणी व्हावी. व त्या दृष्टीने प्रवाश्यांना सोयी सुविधा कमतरता असलेल्या भागात त्या देण्याच्या उद्देशाने राज्यपरिवहन महामंडळामार्फत हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बस स्थानक अभियान स्पर्धात्मक स्वरूपात राबविण्यात येत आहे.या स्वच्छ सुंदर बस स्थानक अभियान स्पर्धेत सहभाग घेतलेल्या वरोरा बस स्थानक व भद्रावती बस स्थानक या वरोरा आगाराच्या बस स्थानकाचे सर्वेक्षण करण्यासाठी आलेल्या सदर समितीमधील तनुजा अहिरकर, विभाग नियंत्रक भंडारा, छगन दिवसे, उपयंत्र अभियंता भंडारा, पराग शंभरकर, कामगार अधिकारी भंडारा, राकेश तलमले, सांख्यिकी अधिकारी भंडारा, यांनी भेट दिली व बसस्थानकाची तपासणी केली. यावेळी वरोरा प्रवाशी विश्वासु संघटनेचे पदाधिकारी ड.विनोद वानखेडे व पत्रकार सादीक थैम यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी वरोरा बसस्थानक येथे रांगोळी काढण्यात आलेली होती व बसस्थानक स्वच्छ सुंदर करण्यात आलेले होते. तसेच सदर तपासणी करिता बस स्थानक सुंदर व स्वच्छ करण्यामध्ये पुण्यवर्धन वर्धेकर, आगार व्यवस्थापक वरोरा व सर्व पर्यवेक्षक कर्मचारी, तसेच सर्व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.

# सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी महाराष्ट्रातील ऐतिहासिक वारसा जपला-डॉ.आगलावे

**वरोरा (प्रतिनिधी)**

सुधिरभाऊ मुनगंटीवार यांनी महाराष्ट्रातील ऐतिहासिक वारसा जपण्याचे कार्य करीत असल्याचे प्रतिपादन डॉ. अंकुश आगलावे, भाजपा जिल्हा महामंत्री ओबीसी यांनी सत्काराप्रसंगी केले. अफजल खानाचा कोथळा बाहेर काढण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांची वापरलेली वाघ नखे लंडन येथील व्हिक्टोरिया आणि अल्बर्ट वस्तुसंग्रहातुन भारतात आणण्याच्या सामंजस्य करारवर स्वाक्षरी करून राज्याचे वन व सास्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर वर्धा जिल्हयाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे वरोरा नगरी ढोल ताशांच्या गजरात गुरूदेव सेवा मंडळ व भारतीय जनता पार्टी वरोच्या वतीने मोठया उत्साहात भव्यदिव्य स्वागत करून सत्कार करण्यात आला. सुधिर भाऊ हे आमचे मार्गदर्शक व खंबीर नेतृत्व असून त्यांना महाराष्ट्राचे भावी मुख्यमंत्री बनविण्याचा संकल्प यावेळी भाजपा वरोरा शहराच्या वतीने घेण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजाचे वापरलेले वस्तु आणण्याचा सौभाग्य प्राप्त झाले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाचे विचारक असून महाराष्ट्राचे सांस्कृतिक वारसा जपण्याचे कार्य सुधिरभाऊच्या हस्ते होत असल्याचे डॉ. आगलावे यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजाच्या समाधीला अ दर्जा मिळवून दिला तसेच अनेक ऐतिहासिक वास्तुंचा जीर्णोध्दार सुधिरभाऊच्या प्रयत्नांने झाले. . डॉ. आगलावे पुढे म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराजाचे वाघ नखे, तलवार तसेच अनेक ऐतिहासिक वस्तु असून क्रम क्रमाने महाराष्ट्रात आणणार आहेत. सामजस्य करार हा तीन वर्षाचा असून महाराष्ट्रातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या शहरात प्रदर्शनास ठेवण्यात येणार आहे.



# संपूर्ण समाजाला न्याय देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले-डॉ. सतिश वारजूकर

**चिमूर (प्रतिनिधी)**

धम्मचक्र प्रवर्तन दिन' हा भारतात साजरा केला जाणारा महत्वाचा उत्सव आहे. या दिवशी महाराष्ट्रासह देशभरातील लाखो अनुयायी नागपूरला येतात. या दिवसाची पार्श्वभूमी म्हणजे १४ ऑक्टोबर १९५६ रोजी दीक्षाभूमी, नागपूर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अनुयायांसोबत बौद्ध धर्मात प्रवेश केला. तेव्हापासून हा दिवस 'धम्मचक्र प्रवर्तन दिन' म्हणून साजरा केला जातोय.

आज चिमूर विधानसभा क्षेत्रातील चिमूर तालुक्यातील बौद्ध पंच कमिटी दाबका हेटी येथे सामूहिक बौद्ध वंदना घेण्यात आली व धम्म चक्र परिवर्तन दिनाच्या निमित्त ध्वजारोहन व मार्गदर्शन करतांना ७४ चिमूर विधानसभा क्षेत्राचे



समन्वयक तथा उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश डॉ. सतिश वारजूकर, माजी उपसभापती पंचायत समिती चिमूर तथा अध्यक्ष युवक कांग्रेस चिमूर विधानसभा रोशन ढोक, माजी पंचायत समिती सदस्य भावना बावनकर, ग्रामपंचायत सदस्य उपकक्षम रामटेके,कांग्रेस कार्यकर्ते दिलीप समर्थ,कवडु समर्थ,संबाजी सूर्यवंशी,सागर राऊत, प्रणाली मेश्राम, सारिका राऊत,स्वप्नील खोब्रागडे, सुनंदा खोब्रागडे,बुद्धगया राऊत,अजित रामटेके,व बौध्द उपासक व उपासिका उपस्थित होते.

## जाहीर सूचना

या जाहीरनाम्या द्वारे जाहीर करण्यात येते की , अर्जदार श्री सदाशिव विठू उताणे रा . वनोजा ता . वरोरा जि . चंद्रपूर यांची मौजा - नागाळा रिठ येथील भूमापन क्रमांक -६७ आरजी २. २० हे . आर . सारा रुपये ४. या शेतीच्या सात - बारा वरील मारोती मोडक , तुळशिराम विठू , जानबा नारायण वांढरे . कुळ नेमण्यात आले आहे . त्यामुळे सदर कुळ खारीज करण्याबाबतचा अर्ज दिनांक - २ मार्च २०२३ रोजी तहसील कार्यालय , वरोरा येथे दाखल केलेला आहे .

तरी उपरोक्त जागेवरील कुल खारीज करण्याबाबत संबंधित कोणास काही आक्षेप तक्रार किंवा हरकत असल्यास जाहीर नोटीस प्रिसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरूपात आपले आक्षेप , तक्रार , किंवा हरकत तहसील कार्यालय . वरोरा येथे कार्यालयीन वेळेत व दिवशी सादर करावे . मुद्यता नंतर प्राप्त होणारे आक्षेप , तक्रार किंवा हरकत विचारात घेतल्या जाणार नाही . विहित कालावधी संपल्यानंतर मौजा - नागाळा रिठ येथील भूमापन क्रमांक -६७ आरजी २. २० हे . आर . सारा रुपये ४. या शेतीच्या सात - बारा वरील मारोती मोडक , तुळशिराम विठू , जानबा नारायण वांढरे हे कुळ खारीज करण्यात येईल . याची सर्वांनी नोंद घ्यावी .

**श्री.सदाशिव विठू उताने ,**
**रा.नोजा ता.वरोरा जि .चंद्रपूर**






















सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .